**बी. ए. भाग ३ (सत्र VI)**

**साहित्यविचार अभ्यासपत्रिका क्रमांक १२ (DSE- E 126)**

**SUB. CODE - 65671**

**बहुपर्यायी प्रश्निका**

१) शब्दांचे अर्थ व्यक्त करण्याच्या क्षमतेला काय म्हणतात?

अ) मुख्यशक्ती ब) प्रधानशक्ती क) शब्दशक्ती ड) अर्थशक्ती

२) आपला दैनंदिन भाषिक व्यापार कोणत्या शब्दशक्तीवर चालतो?

अ) अभिधा ब) लक्षण क) व्यंजना ड) आर्थी व्यंजना

३) अभिधा या शक्ती पासून मिळणाऱ्या अर्थाला काय म्हणतात?

अ) लक्ष्यार्थ ब) व्यंग्यार्थ क) शब्दार्थ ड) वाच्यार्थ

४) 'पानिपतावर सव्वा लाख बांगडी फुटली' या वाक्यात कोणती शब्दशक्ती कार्यरत आहे?

अ) व्यंजना ब) अभिधा क) लक्षणा ड) योगरूढी

५) 'पंकज' म्हणजे 'कमळ' हा अर्थ व्यंजनेच्या कोणत्या प्रकारामुळे प्राप्त होतो?

अ) रूढयोग ब) रूढ क) योग ड) योगरूढ

६) मुख्यार्थबाध कोणत्या शब्दशक्तीत होतो?

अ) अभिधा ब) लक्षणा क) आर्थीव्यंजना ड) व्यंजना

७) शब्दाद्वारे व्यंग्यार्थ सूचित होतो तेव्हा कोणती व्यंजना होते?

अ) शाब्दि व्यंजना ब) आर्थी व्यंजना क) मुख्यार्थ व्यंजना ड) लक्ष्यार्थ व्यंजना

८) रस्वध्वनीला दुसऱ्या कोणत्या नावाने संबोधले जाते?

अ) लौकिकध्वनी ब) वस्तूध्वनी क) अलंकारध्वनी ड) अलौकिकध्वनी

९) भारतमुनी यांच्या ग्रंथाचे नाव काय?

अ) नाट्यशास्त्र ब) साहित्यदर्पण क) ध्वन्यालोक ड) रससूत्र

१०) माणसाच्या ठिकाणी कायमस्वरूपी असणाऱ्या भावनांना काय म्हणतात?

अ) नाट्यभाव ब) संचारीभाव क) स्थायीभाव ड) सात्विकभाव

११) भरतमुनींनी सांगितलेल्या संचारीभावांची संख्या किती?

अ) तेहतीस ब) एकोणपन्नास क) आठ ड) नऊ

१२) क्रीडानंदाची उपपत्ती कोणी मांडली?

अ) रिचर्डस् ब) मिल्टन क) हर्बर्ट स्पेन्सर ड) रिस्टॉटल

१३) प्रा. ना. सी. फडके यांनी रसिकांना होणाऱ्या आनंदाविषयी कोणती उपपत्ती मांडली?

अ) पुनःप्रत्यय ब) तादात्म्य क) ज्ञानानंद ड) जिज्ञासापूर्ती

१४) निर्मितीच्या आनंदाचे महत्त्वाचे अंग कोणते?

अ) आत्माविष्कार ब) जिज्ञासापूर्ती क) पुनःप्रत्यय ड) प्रत्यभिज्ञा

१५) शोक किंवा दुःख हा स्थायीभाव कोणत्या रसात दिसतो?

अ) रौद्ररस ब) बीभत्स रस क) अद्भुतरस ड) करूणरस

१६) कॅथार्सिसचा सिद्धांत कोणी मांडला?

अ) रिस्टॉटल ब) रुसो क) हर्बर्ट स्पेन्सर ड) माधव ज्युलियन

१७) 'विरेचन म्हणजे होमिओपॅथी पद्धत आहे' असे मत कोणी मांडले?

अ) रिस्टॉटल ब) मिल्टन क) क्रोचे ड) वर्डस्वर्थ

१८) लेखकागणिक बदलणारी भाषा कोणती?

अ) साहित्यभाषा ब) ग्रामीणभाषा क) शास्त्रभाषा ड) व्यवहारभाषा

१९) सार्वजनिकता हा कोणत्या भाषेचा महत्त्वाचा गुण आहे?

अ) साहित्यभाषा ब) व्यवहारभाषा क) शास्त्रभाषा ड) संकेतभाषा

२०) तर्कसुसंगत मांडणी आणि अचूकता ही कोणत्या भाषेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत?

अ) साहित्यभाषा ब) संकेतभाषा क) शास्त्रभाषा ड) बोलीभाषा

२१) सर्जनशीलता हा कोणत्या भाषेचा गुण आहे?

अ) साहित्यभाषा ब) व्यवहारभाषा क) शास्त्रभाषा ड) शास्त्रभाषा

२२) लेखकाला आलेल्या भावनांची पुनर्निर्मिती कोणत्या भाषेतून होते?

अ) व्यवहारभाषा ब) शास्त्रभाषा क) साहित्यभाषा ड) बोलीभाषा

२३) व्यवहारभाषेचे संदेशन किती पदरी असते?

अ) एकपदरी ब) दुपदरी क) तीनपदरी ड) चौपदरी

२४) विविधरूपता हे कोणत्या भाषेचे वैशिष्ट्य आहे?

अ) व्यवहारभाषा ब) शास्त्रभाषा क) बोलीभाषा ड) साहित्यभाषा

२५) ज्ञान व बोध हे कोणत्या भाषेचे वैशिष्ट्य आहे?

अ) शास्त्रभाषा ब) संकेत भाषा क)व्यवहारभाषा ड) बोलीभाषा

प्रश्न २) अंतर्गत विकल्पासह दीर्घोत्तरी प्रश्न

१. शब्दशक्ती म्हणजे काय ते सांगून अभिधा शक्तीचे प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

२. लक्षणा म्हणजे काय ते सांगून, लक्षणेचे महत्त्व सांगून, लक्षणेसाठी आवश्यक गोष्टी कोणत्या आहेत ते सविस्तर सांगा.

३. व्यंजना म्हणजे काय ते सांगून, व्यंजनेचे साहित्यातील महत्त्व सांगून व्यंजनेचे प्रकार स्पष्ट करा.

४. शब्दांच्या अभिधा आणि लक्षणा शक्तींचा सविस्तर परिचय करून द्या.

५. रस म्हणजे काय ते सांगून भरताचे रससूत्र सविस्तर सांगा.

६. रस म्हणजे काय ते सांगून रसाचे स्वरूप, कार्य आणि काव्यातील महत्त्व स्पष्ट करा.

७. रसिकांना होणाऱ्या आनंदाचे स्वरूप उपपत्तीच्या आधारे स्पष्ट करा.

८. काव्यानंद मीमांसेचे स्वरूप स्पष्ट करा.

९. साहित्यिक भाषेची वैशिष्ट्ये सविस्तर स्पष्ट करा.

१०. व्यवहारभाषा, साहित्याची भाषा व शास्त्रभाषा यातील भेद स्पष्ट करा.

प्रश्न ३) अंतर्गत विकल्पासह लघुत्तरी प्रश्न (तीन पैकी दोन)

१. लक्षणेची व्याख्या सांगून लक्षणेस आवश्यक गोष्टींची माहिती लिहा.

२. अभिधा शब्द शक्तीचे प्रकार स्पष्ट करा.

३. व्यंजनेचे साहित्यातील महत्त्व सांगा.

४. व्यंजनेचे प्रकार स्पष्ट करा.

५. लक्षणेने साहित्यातील महत्त्व सांगा.

६. शब्दशक्ती म्हणजे काय?

७. रसाचे काव्यातील स्थान स्पष्ट करा.

८. शाब्दी व्यंजनेच्या प्रकारांची माहिती द्या.

९. साहित्य भाषेची विविधता सांगा.

१०. साहित्य भाषेचे सौंदर्य स्पष्ट करा.

११. साहित्याचे माध्यम भाषा स्पष्ट करा.

१२. व्यवहार भाषेची वैशिट्ये सांगा.

१३. साहित्य म्हणजे काय थोडक्यात सांगा.

१४. रसाचे काव्यातील स्थान स्पष्ट करा.

१५. व्यभिचारी किंवा संचारी भावाचे स्वरूप स्पष्ट करा.

१६. काव्यानंद मीमांसा म्हणजे काय ते सांगा.

१७. केवलानंदाच्या मर्यादा स्पष्ट करा.

१८. विरेचन सिद्धांत सांगा.

१९. व्यवहार भाषा व साहित्य भाषा भेद स्पष्ट करा.

२०. शास्त्रभाषा व साहित्यभाषा साम्यभेद स्पष्ट करा.

प्रश्न ४)

छंद म्हणजे काय ते सांगून खालील छंदांची लक्षणे व उदाहरणे लिहा.

१. अभंग

२. ओवी

३. मुक्तछंद

वृत्त म्हणजे काय ते सांगून खालील वृत्ताचे लक्षण व उदाहरण लिहा

१. भुजंगप्रयात

२. वसंतलिका

३. दिंडी